CMYK

डोणगाव येथील एन ए ले आउटचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर; अनेकांच्या घरांचे स्वप्न भंगणार? >> पान 2

कबरी उखडण्याचे राजकारण फडणवीस यांच्या लोकांचे >> पान 3

ईदनिमित्त आ. सिद्धार्थ खरात यांच्या ईदगाह येथे जाऊन शुभेच्छा >> पान 4

सुविचार
स्वत:वर विश्वास ठेवा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 228 ■ मंगळवार, दि. 01 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मी भाग्यवान आहे की..., सोनाक्षीवर माहेरच्यांपेक्षा सासरचे लोक करतात मुलीसारखं प्रेम
आतील पान

# बीडच्या तुरुंगात दोन गटात राडा

## वाल्मिक कराड, सुदर्शन घुलेला मारहाण?

दैनिक आपला विदर्भ



**बीड/प्रतिनिधी : बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला. यानंतर आरोपींना अटक करावी, त्यांच्यावर कठोरातील कठोर कारवाई व्हावी यासाठी विरोधकांसह सर्व स्तरातून मागणी होऊ लागली. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले आणि इतर आरोपींना अटक करण्यात आली. पण तुरुंगात या आरोपींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालाय. यासंदर्भातील धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

आरोपी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेला तुरुंगात मारहाण झाल्याची माहिती आहे.बीड जेलमध्ये दोघांना कैद्यांकडून मारहाण झाल्याची सूत्रांची माहिती आहे. महादेव गित्ते, अक्षय आठवलेने मारहाण केल्याचं समजतंय. संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड आणि सुदर्शन घुले हे जिल्हा कारागृहात शिक्षा भोगत आहेत. दरम्यान याच कारागृहात बापू आंधळे हत्या प्रकरणातील आरोपी महादेव गीते आणि अक्षय आठवलेदेखील आहेत.



संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेला वाल्मीक कराड हा सध्या बीड जिल्हा कारागरामध्ये नऊ नंबरच्या बराक मध्ये आहे. त्याचबरोबर हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले आणि इतर आरोपी ही याच जिल्हा कारागरामध्ये असून त्याच कारागृहामध्ये आहेत. परळीतील सरपंच बापू आंधळे हत्या प्रकरणातील आरोपी महादेव गीते देखील या जिल्हा करागरामध्ये आहे. आरोपी वाल्मीक कराड आणि महादेव गीते यांचे जुनेच वाद असल्याचे समोर येत आहे. दरम्यान ते एकमेकांचे राजकीय विरोधक आहेत.

बीड जिल्हा कारागृहामध्ये दोन टोळ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली. यानंतर वाद झाला आणि वादाचे रुपांतर मारहाणीत झाल्याचे सांगण्यात येतंय. हा वाद कशामुळे घडला? याबद्दलची माहिती समोर आलेली नाही.

सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी अटकेत असलेला वाल्मिक कराड हा फिल्म प्रोड्यूसर असल्याची माहिती समोर येतीये. वाल्मिक कराडकडे एका नामांकित कंपनीचं आयकार्ड होतं.. सोशल मीडियावर त्याचं हे आयकार्ड व्हायरल झालंय. या आयकार्डमध्ये तो फिल्म प्रोडक्शन कंपनीचा आजीव सभासद असल्याची नोंद आहे. बीकेसीमध्ये कराडचं ऑफिस असल्याचा दावाही निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केलाय.

**कृष्णा आंधळे फरार**

सरपंच संतोष देशमुखांच्या हत्येला १११दिवस पूर्ण झाले. मात्र तरीही आरोपी कृष्णा आंधळे पोलिसांना काही सापडत नाहीए.कृष्णा आंधळेचा शोध पोलीस, सीआयडीची पथकं घेताहेत. बीड पोलिसांनी त्याला फरार घोषित केलंय. आंधळेची माहिती देणा-याला बक्षीस मिळेल, असंही पोलिसांनी जाहीर केलंय. मात्र तरीही आंधळेचा पत्ता अद्याप लागला नाहीये.

## वाचाळवीरांवर कठोर कारवाईसाठी कायदे करावेच लागणार; राम शिंदेंचा उदयनराजेंच्या मागणीला पाठिंबा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार होणाऱ्या अवमानावरून भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी काही दिवसांपूर्वी राज्य सरकारला घरचा आहेर दिला. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वारंवार आक्षेपार्ह विधाने केली जातात, या मुद्यांवर बोलताना सरकार काय बोळ्याने दूध पितं का? असे म्हणत त्यांनी संताप व्यक्त केला होता. तसेच सर्व पक्षातील लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन एक विशेष अधिवेशन बोलवावं आणि तात्काळ कायदा पारित करावा, अशी मागणी देखील त्यांनी केली होती. आता उदयनराजे यांच्या भूमिकेला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी पाठिंबा दर्शवला आहे. राष्ट्रपुरुषांची बदनामी करणाऱ्या वाचाळवीरांवर कठोर कारवाईसाठी कायदे करावे लागणार, असे म्हणत त्यांनी वाचाळवीरांचे कान टोचले आहे.



राम शिंदे म्हणाले की, आज कोणीही उठतो आणि सोशल मीडियावर किंवा टीव्ही मीडियावर राष्ट्रपुरुषांच्या बाबतीत स्वत:च्या फायद्यासाठी किंवा प्रसिद्धीसाठी बदनामीकारक वक्तव्य करतो. हे अतिशय दुर्दैवी आहे. आपली परंपरा जोपासण्याचे सर्वांचेच कर्तव्य आहे. जर कोणी अशा पद्धतीचे आक्षेपार्ह वक्तव्य करत असतील, तर कायद्याने त्याच्यावर कारवाई करणे हे आपल्याला करावे लागणार आहे. आपले संस्कृती जपण्याचे काम हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. याबाबत खासदार उदयन महाराज किंवा संभाजी महाराज यांनी केलेली मागणी योग्य आहे. राज्य सरकार असो वा केंद्र सरकार असो आपल्याला याबाबत कठोर कायदा करावा लागणार आहे. त्याशिवाय हे थांबणे अशक्य असल्याचे दिसत आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.



## पीक विमा योजनेवरून राजू शेट्टी यांचे सरकारवर गंभीर आरोप!

**नवी दिल्ली :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विधानामुळे शेतकरी कर्जमाफीचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. त्यांच्या वक्तव्यावरून शेतकरी संघटना आक्रमक झाल्या असून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे. यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

कर्जमाफीचे आश्वासन खोटे होते का?

राजू शेट्टी यांनी राज्य सरकारला जाब विचारत म्हटले की, ''आज ३१ मार्च आहे, आणि त्याआधी कर्ज फेडण्याची सक्ती केली जात आहे. बँकांकडून शेतकऱ्यांना नोटिसा पाठवण्यात येत आहेत. हा सगळा नियोजनबद्ध कट आहे का?'' महायुती सरकारने निवडणुकीच्या जाहीरनाम्यात ३ लाखांपर्यंत कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते आता पाळले जाणार आहे का? शेतकऱ्यांना २० टक्के जादा अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली होती, पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे? हरभरा आणि सोयाबीन खरेदी होत नाही, कांदा उत्पादक अडचणीत आहेत, ऊस उत्पादकांचेही हाल होत आहेत. मग सरकारनं अशक्य आश्वासने का दिली?'' असे सवाल शेट्टी यांनी सरकारला केले आहेत.

>> पान २

## विखे पाटलांच्या साखर कारखान्यास २९६ कोटींची मदत

### निवडणुकीच्या तोंडावर सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रवरा नगरमधील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्याच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. कारखान्याच्या निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र सरकारने अहमदनगर जिल्ह्यातील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यास मोठी आर्थिक मदत जाहीर केली आहे.

राज्य सरकारच्या हमीवर राष्ट्रीय सहकार विकास निगम मार्फत २९६ कोटी रुपयांचे खेळते भांडवल या कारखान्यास मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारने अहमदनगर जिल्ह्यातील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यास मोठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**आर्थिक मदत कोणाच्या फायद्याची ठरणार?**

कारण जिल्ह्यातील भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यातील राजकीय संघर्ष सर्वश्रुत आहे. या दोन्ही नेत्यांच्या गटांत साखर कारखान्यांच्या निवडणुकांवरून मोठी चुरस असते. विशेषत: संगमनेरमधील भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना आणि प्रवरा नगरमधील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्याच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. राजकीय समीकरणे आणि सहकार क्षेत्रातील हालचाली पाहता ही आर्थिक मदत नेमकी कोणाच्या बाजूने फायद्याची ठरणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**प्रांताधिकारी हिंगे, आहेर यांच्यावर थोरात, विखे कारखान्याची जबाबदारी**



दरम्यान, नगरसह राज्यात नावलौकिक असणाऱ्या संगमनेरच्या थोरात कारखाना आणि प्रवरानगरच्या विखे पाटील कारखान्यासाठी निवडणूक होणार आहे. यासाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून आता निवडणूक निर्णय अधिकारी यांचीही नियुक्ती राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण यांच्या वतीने करण्यात आली आहे. यात संगमनेर साखर कारखान्यासाठी संगमनेरचे उपविभागीय अधिकारी शैलेश शालिग्राम हिंगे यांची नियुक्ती करण्यात आली असून या ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संगमनेरचे तहसीलदार धीरज बाळासाहेब मांजरे काम पाहणार आहेत. तर डॉ. विखे पाटील सहकारी साखर कारखान्यासाठी शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर काम पाहणारा असून त्यांना राहाता येथील तहसीलदार अमोल रमाकांत मोरे सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून मदत करणार आहेत.

## मागण्या मान्य न झाल्यास, कोणताही शेतीमाल रस्त्यावर व बाजारात जाऊ देणार नाही - रघुनाथदादा पाटील (शेतकरी संघटना)

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** गेल्या १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या मुहूर्तावर आम्ही कर्जमुक्ती अभियानाचा प्रचार सुरू केला. आणि त्याचा शेवट पुण्याला १९ मार्च साहेबराव करपे, मालती करपे आणि त्यांचे दोन मुलं, दोन मुली अशा सहा जणांच्या आत्महत्या चा स्मरण दिन. ३९ वर्षे आम्ही स्मरण दिवस साजरा करतोय. असं छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती पासून ते साहेबराव करपे स्मृती दिन पर्यंत एक महिना जनजागरण करून १९ तारखेला पुण्याला आम्ही प्रचंड मोठा मोर्चा



काढला. कृषी आयुक्त आणि त्या ठिकाणी संपूर्ण कर्जमुक्ती झाली पाहिजे, शेतकऱ्यांच कर्ज हे सरकारचं पाप आहे तेव्हा जोपर्यंत सरकारचा पाप सरकारनेच धुतलं पाहिजे. पुन्हा शेतकऱ्यांवर कर्ज होऊ नये, म्हणून सर्व शेतमालावरील निर्यात बंदी काढून टाकली पाहिजे. उसाच्या बाबतीमध्ये गेल्या वर्षाच्या गाळप झालेल्या उसाला पाच हजार रुपये भाव दिला पाहिजे, तर दोन कारखान्यामधील अंतराची अट काढून टाकली पाहिजे. या तीन-चार मागण्या घेऊन आम्ही आंदोलन सुरू केल. त्याला प्रतिसाद म्हणून महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित दादा पवार यांनी २१ तारखेला सभागृहांमध्ये घोषणा केली.

मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली कर्जमुक्तीचे समिती स्थापन केली. आम्हाला वाटलं की आता सरकारच पावले कर्ज मुक्तीच्या दिशेने पडतील. परंतु दुर्दैव असं आहे की, हे सगळे लबाड राजकार्त्यांनी निवडणुकीपूर्वी आश्र्वासने दिली. पण आता अजित दादांनी सांगितलं की, कर्ज भरायला पाहिजे.

>> पान २




## मोफत धान्यासाठी लवकर करा 'हे' काम अन्यथा रेशन कार्ड होईल आजच बंद!

**मुंबई/प्रतिनिधी :** रेशनधारकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारने नागरिकांसाठी अनेक योजना राबवली आहे. त्यातील एक म्हणजे रेशनवर मिळणार मोफत धान्य. या धान्यामुळे अनेक गोरगरिबांच्या पोटाची खळगी भरून निघते. या रेशन कार्डवर नागरिकांना मोफत अन्नधान्य मिळते. यामुळे त्यांचा खर्च कमी होतो. तुमच्या जवळ असलेल्या रेशन दुकानावर जाऊन रेशन कार्ड दाखवून धान्य घेऊ शकतात.

>> पान २

CMYK

# डोणगाव येथील एन ए ले आउटचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर; अनेकांच्या घरांचे स्वप्न भंगणार?

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : घराचे स्वप्न पाहणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांच्या आशेवर नियमबाह्य लेआउटचे प्लॉट माथी मारल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या आशेवर पाणी फेरल्या गेले आहे. डोणगाव मेहकर येथील उपविभागीय अधिकाऱ्यांनी नोटीसा बजावल्याने डोणगाव येथील नियमबाह्य लेआउटही प्रशासनाच्या रडारवर येण्याची शक्यता असून याबाबत डोणगाव परिसरात चांगलीच चर्चा रंगत आहे. अधिकाऱ्यांनी नियमबाह्य लेआउट पाडणाऱ्या मालकांना पाठीशी घातले असल्याचा आरोपही जनतेकडून होत आहे.यामध्ये मात्र, सर्वसामान्य जनतेची फसवणूक झाल्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहेत.**

डोणगाव हे गाव नागापूर ते छत्रपती संभाजी नगर मार्गावर आहे. त्यामुळे डोणगाव चा विस्तार झपाट्याने होत आहे. त्याचबरोबर डोणगावला आजुबाजुचे तब्बल ३२ खेड्याच्या वर जनतेचा व्यवसायिक संबंध असल्याने व डोणगाव येथून मेहकर हे आर्थिक दृष्ट्या दैनंदिन ये-जा करण्याच्या दृष्टीने न परवडणारे असल्याने डोणगाव मध्ये व्यापार, वसाहत यासह इतर छोटे मोठे अनेक व्यवसाय झपाट्याने वाढत आहे. परिणामी, डोणगाव चा विस्तार चोहोबाजुंनी होत आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता काही लेआउट मालकांनी नागरिकांच्या समस्येचा फायदा घेत नियमबाह्यरित्या प्लॉट पाडून त्याची विक्री केली असल्याचा प्रकार समोर आला आहे. प्लॉट विक्रेत्यांने मात्र, गोरगरीब जनतेची आर्थिक फसवणूक झाली असल्याची चर्चा आता डोणगाव परिसरात होत आहे. मात्र नियमबाह्य परवानगी दिल्या असल्याचा प्रकार आता समोर आला असल्याची चर्चा प्लॉट खरेदीदारांमध्ये सुरू आहे. प्लॉट विक्री करणाऱ्यांच्या या स्वार्थीवृत्तीमुळे मात्र घराचे स्वप्न पाहणाऱ्या गोरगरिबांचे घराचे स्वप्न भंगले असल्याची चर्चा डोणगाव परिसरात सुरू आहे.


## चक्क नदीपात्रातच लेआउटची आरवणी

डोणगाव येथून जाणाऱ्या नदीमध्ये प्लॉट विक्रेत्यांनी लेआउट ची आखणी करून नदीमधीलच प्लॉट विक्री करून नियमबाह्य कामे करण्याचे हद्द ओलांडल्याची प्रकार समोर आला आहे. नदीमध्ये लेआउटचे आखणी करून ते प्लॉट विक्री करणाऱ्या त्याचबरोबर खरेदी करणाऱ्यांने ही कमाल केली. असे अनेक प्रकार डोणगाव परिसरात सुरू आहे. विशेष म्हणजे या नदीवरून छत्रपती संभाजी नगर येथे जाणारा रस्त्यावर मोठा पूल बांधण्यात आलेला आहे. याबाबत तक्रारी झाल्याच्या नंतर तलाठी,मंडळ अधिकारी यांनी सदर लेआउट नदीच्या पात्रात प्लॉट आखणी करण्याची पंचनामा केला आहे. मेहकर येथील लेआउटचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर आल्यानंतर आता डोणगावातील लेआउट बाबत चर्चेला उधाण आले आहे.डोणगावातील नियमबाह्य लेआउट विक्रेते पाडून प्लॉट विक्री करणारे विक्रेत्या प्रशासनाच्या रडारवर आले असल्याची चर्चा आहे. याबाबत आता प्रशासन काय भूमिका घेते.याकडे डोणगाव परिसरातील जनतेचे लक्ष लागलेली आहे...



संग्रहीत छायाचित्र

# हैदराबाद शिर्डी नाईट लँडिंग विमानसेवा सुरू; इंडिगोच्या नवीन विमानांचा समावेश







दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर /प्रतिनिधी :** गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर, शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाने धावपट्टीच्या डांबरीकरणाचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. ज्यामुळे आता प्रथमच रात्रीच्या विमानसेवा सुरू झाल्या आहेत. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) च्या अथक प्रयत्नांमुळे आणि विविध नियामक संस्थांच्या पाठिंब्यामुळे हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट साधले गेले आहे, ज्यामुळे शिर्डी या पवित्र शहरासाठी हवाई संपर्क अधिक सुलभ होणार आहे.

या महत्त्वपूर्ण घटनेचे औचित्य साधून, इंडिगो एअरलाइन्सने दोन अतिरिक्त विमानांचा समावेश केला आहे. ज्यात एक सकाळची आणि एक रात्रीची सेवा आहे. विशेष म्हणजे, इंडिगोने हैदराबाद-शिर्डी-हैदराबाद मार्गावर ७८ प्रवाशांच्या क्षमतेची नियमित विमानसेवा सुरू केली आहे. जी गुढीपाडव्याच्या शुभदिनी नागरिकांना भेट म्हणून सुरू करण्यात आली आहे. या नवीन समावेशामुळे, शिर्डी विमानतळावर आता दररोज एकूण ११ विमानांची (२२ हालचाली) वाहतूक होईल. ज्यामुळे दररोज अंदाजे ३,००० प्रवाशांची सोय होईल, जो विमान वाहतूक उद्योगातील वाढ आणि पायाभूत सुविधांच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाचा विकास आहे. अनेक विमान कंपन्यांनी अधिक विमाने सुरू करण्यात रस दाखवला आहे. ज्यामुळे साईबाबांच्या दर्शनासाठी आणि पहाटे ४ वाजता सुरू होणाऱ्या काकड आरतीसाठी येणाऱ्या भाविकांसाठी अखंडित प्रवास अधिक सुलभ होईल.

## मोदी सप्टेंबरमध्ये निवृत्त होणार? संजय राऊतांच्या दाव्याने खळबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये निवृत्त होणार असून, त्याचा अर्ज लिहिण्यासाठीच नागपूरच्या संघ मुख्यालयात गेले होते असा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मोहन भागवत आणि संपूर्ण संघ कुटुंब देशाच्या नेतृत्वात बदल अपेक्षित करत आहे असंही ते म्हणाले आहेत. तसंच मोदींचा वारसदार संघ ठरवेल असं दिसत आहे. संघ पुढील नेता ठरवेल आणि तो बहुतेक महाराष्ट्रातील असेल असाही मोठा दावा त्यांनी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे.

''नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये निवृत्त होत असल्याचा अर्ज लिहिण्यासाठी ते बहुतेक संघाच्या मुख्यालयात गेले होते. माझ्या माहितीनुसार, १०-१२ वर्षात ते कधी गेले नाहीत. ते मोहन भागवतांना आता मी जात आहे हे सांगण्यास गेले होते. मोहन भागवत आणि संपूर्ण संघ कुटुंब देशाच्या नेतृत्वात बदल अपेक्षित करत आहे. मोदींची वेळ संपली असून देशात बदल अपेक्षित करत आहे. भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्षही आपल्या स्वेच्छेने निवडण्याची इच्छा आहे. त्यासाठी मोदी गेले होते. नरेंद्र मोदी जात आहेत,'' असं संजय राऊत म्हणाले आहेत.

## एप्रिल फूल

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फूल म्हणून साजरा केला जातो. फूल ( षेश्र ) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फूल करण्याचा आनंद आपण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फूल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्रि्चतपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख ( षेश्र ) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फूल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फूल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फूल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हॉट्सप, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फूल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फूल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फूल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फूल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फूल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फूल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फूल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिल फूल करावे. मोठेपणाला एप्रिल फूल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिल फूल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

## ढाणकी शहरात रमजान ईद उत्साहात साजरी; मुस्लिम बांधवांनी केली सामुदायिक नमाज ईदगाहवर अदा



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/तालुका प्रतिनिधी :** शहरात ईद-उल-फित्र सोमवारी उत्साहात व शांततेत पार पडली. सकाळी ९ वाजता ईदची सामुदायिक नमाज ढाणकी येथील ईदगाह मैदानात पार पडली. नमाजसाठी शहरातील मुस्लिम बांधव हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. रमजान महिन्याच्या २९ उपवासनंतर संध्याकाळी चंद्रदर्शन झाल्याने सोमवारी ईद सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली.

ईद शांततेत होण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने ईदगाह मैदान व शहरातील विविध भागात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नमाजनंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने ठाणेदार कैलास भगत व उप निरक्षक शिवाजी टिपूर्णे व राजकीय नेत्याच्या वतीने बाळू पाटील चंद्रे, भास्कर पाटील यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शहरात दिवसभर मुस्लिम बांधवांसह इतर समाजबांधवांनी एकमेकांना भेटून ईदच्या शुभेच्छा देत होते. ईदनिमित्त शहरात सामाजिक एकतेचे दर्शनही घडले.

पान १ वरून...

## पीक विमा योजनेवरून

पीक विमा योजनेवरही गंभीर आरोप

राजू शेट्टी यांनी पीक विमा योजनेवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, ''१ रुपयात पीक विमा'' ही योजना पूर्णत: फसवी आहे.रब्बी हंगाम संपला तरी शेतकऱ्यांना विमा रक्कम मिळालेली नाही. विमा कंपन्या आणि महसूल विभाग यांची संगणमताने शेतकऱ्यांना फसवले जात आहे. हे शासकीय मान्यतेने सुरू असलेला सरळसरळ आर्थिक दरोडा आहे.''

कृषी क्षेत्रावर मोठे संकट ,सरकार काय करणार?

शेट्टी यांनी कापूस, मका आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणीही मांडल्या. जागतिक बाजारपेठेत झालेल्या बदलांमुळे भारतीय शेतकऱ्यांना मोठ्या तोट्याला सामोरे जावे लागत आहे. सरकारने तातडीने ठोस भूमिका घेतली नाही, तर देशभरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल.शेतकरी संघटनांनी एकत्र येऊन केंद्र सरकारवर दबाव टाकण्यासाठी लवकरच बैठक बोलवण्याचा निर्णय घेतला आहे.

## मागण्या मान्य न झाल्यास

कर्जमाफी देण्यासाठी राज्याचे परिस्थिती नाही आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की, अजित दादा जे बोललेले आहेत ती सरकारची भूमिका आहे. आणि सरकार सुद्धा कर्जमाफी करणार नाही. त्या अशा लबाड लोकांना काय धडा शिकवायचा, त्यासाठी आजची पत्रकार परिषद आम्ही इथे घेतलेली आहे. आम्ही हलग्या हातात घेऊन, कर्जा नही देंगे, बिजली का बिल भी नही देंगे या घोषणा गावोगाव आम्ही हलग्या वाजवून रोज सकाळ संध्याकाळ शेतकऱ्यांना जागृत करणार आहोत. साबळे जालनातले जे एक चांगले सरपंच आहेत. त्यांनी दाखवून दिले सगळ्या महाराष्ट्राला आणि त्यांचा आदर्श सगळे शेतकरी घेतील. महाराष्ट्रातील आणि आपापल्या गावात या राज्य कर्त्यांना फिरू देणार नाहीत. कर्जमुक्ती घेतल्याशिवाय या हलग्या हातात थांबणार नाही. हे सांगण्यासाठी आजचे पत्रकार परिषद आहे.

२ तारखेला क्रांतिसिंह नाना पाटलांचा पुतळा विश्रामबाग तेथून आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देणार आहोत. तेव्हा हे निवेदन देण्यासाठी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे.

उसाच्या दराच्या संदर्भामध्ये हवाई अंतराची अट घातलेली आहे. ४० किलोमीटर २५ किलोमीटर परंतु महाराष्ट्रात २५ किलोमीटर पाळतय कोण ? ज्या लोकांना कारखाने काढायचे असतात. त्यावेळेला त्यांनी कायद्याची अट मोडून टाकलेली आहे. अंतराच्या अटीच्या बाहेर जाऊन आमच्या राजारामबापू कारखाना पासून पाच दहा किलोमीटर अंतरावर वाघवाडी जवळ कारखाना सुरू होतोय पलीकडे वाटेगावला कारखाना सुरू होतोय. परंतु ज्यावेळी राज्यकर्त्यांना कारखान्यात काढावयाचा असतो. अंतराची अट झाकून ठेवतात, हे आम्ही चालू देणार नाही. आम्हालाही ही अंतराची अट नको आहे. दोन साखर कारखान्यामध्ये अंतराच्या काढून टाकली पाहिजे. संपूर्ण कर्जमुक्ती केली पाहिजे पुन्हा कर्ज होऊ नये, म्हणून शेतीमालावरची निर्यात बंदी उठवली पाहिजे. १४ एप्रिल पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस आहे, त्या तारखेपर्यंत सरकारला आम्ही मुदत देतो. जर या मागण्या मान्य झाल्या नाही, तर १५ तारखेपासून कोणताही शेतीमाल रस्त्यावर येऊ देणार नाही व बाजारातही जाऊन देणार नाही. दूध, साखर, फळे आणि भाजीपाला असला, तर शहराकडे जाऊ दिला जाणार नाही. त्याचा आम्ही काटेकोर बंदोबस्त करणार हे सरकारने ध्यानात घ्याव.

## मोफत धान्यासाठी लवकर करा

यामध्ये गहू, तांदूळ, तेल अशा अनेक गोष्टींचा समावेश आहेत. या गोष्टी तुम्हाला कमी किंमतीत किंवा मोफत मिळतात. मात्र आता काही रेशनधारकांची केवायसी न झाल्यामुळे रेशनकार्ड बंद होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देशातील कोट्यवधी नागरिक केंद्र सरकारच्या मोफत अन्नधान्य योजनेचा लाभ घेत आहेत. ज्या लोकांकडे रेशन कार्ड आहे त्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे. परंतु आता अनेकांचे रेशन कार्ड बंद होणार आहे. ज्या नागरिकांना रेशन कार्ड केवायसी केले नाही त्यांचे कार्ड आता बंद होणार आहे. ही केवायसी करणे अनिवार्य असल्याचं केंद्र सरकारने म्हटलं आहे. यासाठी केंद्र सरकारने अंतिम मुदत दिली होती. परंतु केंद्र सरकारकडून ही मुदत ३१ मार्च पर्यत वाढवून देण्यात आली आहे.

घधउ कसे कराल ?

तुमच्या जवळ असलेल्या रेशनच्या दुकानावर जाऊन ही केवायसी तुम्हाला करता येणार आहे. ही केवायसी बायोमेट्रिक पद्धतीची असणारा आहे. बायोमेट्रिक पद्धतीची केवायसी न केल्यास तुमचं रेशन कार्ड आजच बंद होण्याची शक्यता आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### देशात व राज्यात जे सुरु आहे त्यातून बाहेर पडण्यासाठी संयम ठेवा; इम्तियाज जलील यांचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** रमजानचा महिना आपल्याला सयंम बाळगण्यास शिकवतो. आज देशात आणि राज्यात जे काही सुरू आहे, त्यातून सर्वांना सांगू इच्छितो ह्यामधून बाहेर पडण्याचा सयंम ठेवा. आमच्या मस्जिद मध्ये बॉम्ब लावून स्फोट करण्यात आला.आम्ही नागपूरच्या नेत्यांप्रमाणे शांत राहणार नाही. कोणती कारवाई आम्ही कायद्यात राहूनच करणार. नरेंद्र मोदी आणि अमित शाह ह्या २ व्यक्ती फक्त देश चालवत आहेत. मात्र देशात व राज्यात चालू आहे त्यातून बाहेर पडण्यासाठी जनतेने संयम ठेवावा, असे आवाहन इम्तियाज जलील यांनी केले.

### लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी चालू राहणार; सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी सुरू राहणार असून शेतकऱ्यांनाही कर्जमाफी देण्याबाबत विचारविनिमय सुरू आहे. अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, महाराष्ट्र हे मराठी भाषकांसाठी हे राज्य आहे. राज्य कारभार उत्तम स्तिथीत चालू आहे, म्हणून राज ठाकरे ह्यांचे आम्हाला समर्थन आहे. लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी चालू राहणार आहे. शेतकऱ्यांना कर्ज माफी ऐवजी  देण्याबाबत विचार सुरू आहे. इम्तियाज जलीलचे नातेवाईक औरंगजेब आहेत. येत्या २ महिन्यांमध्ये जिल्हापारिषद व महानगरपालिका निवडणूक होणार आहेत. विजय वडेट्टीवार यांच्याकडून कोणतीही अपेक्षा नाही. कुणाल कामराला हे सरकार सोडणार नाही. असा इशारा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दिला.

### रायगड अलीबागच्या कुंडलिक खाडीत भरल्या शिडाच्या होडींच्या स्पर्धा



दैनिक आपला विदर्भ

**रायगड /प्रतिनिधी :** अलिबाग तालुक्यातील आग्राव इथल्या कुंडलिका खाडीत आज शिडाच्या होड्यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत पन्नासहून अधिक होड्या सहभागी झाल्या होत्या. शिडाच्या होड्या कालबाह्य झाल्या असल्या तरी आजही इथल्या कोळी बांधवांनी ही परंपरा गेली १०० वर्षापासून जपली आहे. आज कुंडलिका खाडीत शिडाच्या होड्यांच्या स्पर्धेचा थरार अनुभवायला हजारो नागरिकांनी गर्दी केली आहे. गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी या स्पर्धा भरविल्या जातात. अलिबाग तालुक्यातील आग्राव आणि अष्टगारातील कोळी बांधव  स्पर्धेत सहभागी होतात. हिरकणी धन्या मल्हार ह्या बोटीचा एक नंबर आला आहे. होड्यांची शर्यत खेळाला क्रिकेट व कबड्डी ह्या खेळांप्रमाणे उच्च दर्जाचे स्थान मिळवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. ह्यापुढेही हि परंपरा अशीच चालू ठेवूया.

### स्लो ओवर रेटमुळे बीसीसीआयची आरआरच्या कॅप्टन रियान परागवर कारवाई

दिसपूर: सलग दोन पराभवांनंतर अखेर राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जचा ६ धावांनी पराभव केला. पण या विजयानंतरही राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागला आर्थिक फटका बसला आहे. बीसीसीआयने रियान परागवर १२ लाखांचा दंड ठोठावला आहे. स्लो ओवर रेटमुळे ही कारवाई करण्यात आली आहे. आयपीएलने प्रसिद्धीपत्रक जारी करत यासंदर्भातील माहिती दिली आहे.

# कबरी उखडण्याचे राजकारण फडणवीस यांच्या लोकांचे

## खासदार संजय राऊत यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : त्यांचच म्हणणे आहे, असे कसे म्हणू शकतात. सातत्याने आम्ही देखील बोलत आहोत.देवेंद्र फडणीस यांनी राज ठाकरे यांना पाठिंबा दिला आहे.कबरी उखडण्याचे राजकारण फडणवीस यांच्या लोकांचे आहे.मंत्रिमंडळातील लोक आहेत. बिनडोक आहेत.त्यांनी वातावरण खराब करण्याचे काम केले आहे.कोणत्या चांगल्या कामाची अपेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आहे. त्यांनी काल चांगल्या कामाची यादी जाहीर केली पाहिजे होती.कुणाल कामरा यांचा स्टुडिओ फोडला, गुन्हेगारांना पाठिशी घातले. अशी टीका खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना केली.**

अनेक उद्योग बाहेर चालले आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणीस बोलत नाही ते चांगलं काम आहे का? मराठी माणसाला घर नाकारला जात आहे, संस्कृतीवर हल्ला होतो आहे.चांगलं काम असेल तर फडणवीस यांचं तर राष्ट्राची गरज आहे. लोकसभेत भाजपच्या सोयीची भूमिका होती. राज ठाकरे यांनी मनावर घेऊन कोणाच्या कानफडात मारायचे ठरवले असेल तर, त्याचे नक्कीच स्वागत आहे. बाळासाहेबांची शिवसेना फोडण्यामागे देवेंद्र फडणवीस, अमित शाह आणि मोदींचा मोठा हात आहे. ही शिवसेना बाळासाहेबांनी मराठी माणसासाठी स्थापन केली. राज ठाकरेंना पाठिंबा देत आहेत.त्यात राजकारण आहे.महाराष्ट्राचे शत्रू आहेत .त्यांना मदत होईल अशी भूमिका कोणीही घेऊ नये. अप्रत्यक्षरीत्या देखील घेऊ नये, असं आमचं मत आहे. राज ठाकरे यांच्या प्रत्येक विषयावरती विश्र्लेषण करणे असे काही नाही. नरेंद्र मोदी यांचे भाषण झाले. संघाने गुलामीच्या बेड्या तोडल्या. हा शोध त्यांनी कुठून लावला? भारतीय स्वातंत्र्यात संघ कुठेही नव्हता. संघाचं योगदान काय आहे? हे एकदा त्यांनी मार्गदर्शन घेतले पाहिजे. तुम्ही लोकांना अंध भक्त करत आहात. हे सर्वजण भ्रम करत आहेत. हा देश वेड्यांचा देश, खोटारड्यांचा देश म्हणून यादीत येईल.फडणवीस यांना चांगलं काम करायचे असेल तर त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्य यांनी कुणाल कामरा ठार मारण्याची धमकी दिली असा माणूस मंत्रिमंडळ कसा राहू शकतो. असा कोण माणूस बोलला असता तर त्याला मोक्का लावला असता. गृहमंत्री बधिर आणि मुख अवस्थेत हे सर्व सहन करत आहेत.नरेंद्र मोदी, अमित शाहा आणि भाजपचे महाराष्ट्रातील नेते यांनी ईडी, सीबीआय, पोलीस यांच्या मदतीने त्यांना हाताशी



धरून गुलाम करून आपल्या राजकीय विरोधकांना छळण्याचा प्रयत्न केला. खोटे गुन्हे दाखल करत कुटुंबाला त्रास दिला, कार्यकर्त्यांना त्रास दिला आहे. या सर्वांचा संदर्भ या पुस्तकात प्रकाशित व्हावे. नरकातला स्वर्ग मराठीतून महाराष्ट्रात मुंबई आणि हिंदी आणि इंग्रजी भाषेत दिल्लीत पुस्तक प्रकाशन होणार आहे. माज्यासारख्या अनेक लोक तुरुंगात गेले. सत्य बोलणाऱ्यांना तुरुंगात टाकले.पुस्तकाचा हेतू गौप्यस्फोट करणे नसतो असे मत त्यांनी व्यक्त केले. नाशिक, धुळे, जळगाव, उत्तर महाराष्ट्र, नगर, शिर्डी नंतर पुण्यामध्ये, मराठवाड्यात प्रत्येक ठिकाणी करू, प्रत्येक शिबिराला उद्धव ठाकरे उपस्थित असणार आहेत.आमची गुढी उभारलेले आहे. आमच्या गुढीचा दांडा पळवण्याचा प्रयत्न झाला. चोऱ्या केल्या दांड्यांच्या, गुढीआमची कायम आहे. मोदी आणि भागवत भेट हे स्पष्ट  संकेत आहेत. जी माहिती बाहेर येते सप्टेंबर महिन्यात नरेंद्र मोदींनी जाहीर केल्याप्रमाणे धोरण ७५ वर्षीय झालेल्यांनी सत्तेच्या पदावर राहू नये, कोणत्याही मंत्री प्रधानमंत्री राष्ट्रपती त्याच्यामुळे सरसंघ चालकांनी त्यांना या त्यांच्या संघाच्या भूमिकेची आठवण करून देण्यासाठी ही चर्चा केली. ती वेळ आपल्यावर आलेली आहे.सप्टेंबर महिना येत आहे. देशाचं नेतृत्व बदलावे लागेल. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी संघाची भूमिका आहे, असे समोर आले आहे. संघाला हवी असणारी व्यक्ती भाजपच्या अध्यक्षपदी असावी, ही संघाची भूमिका स्पष्ट असेल. दहा-अकरा वर्षांनी जाऊन नागपुरात सरसंघ चालक यांना भेटावे लागणे ही काय साधी गोष्ट नाही. इतक्या वर्षात कधीच गेले नाहीत.नड्डा यांनी तर सांगितले होते की, आम्हाला संघाची गरज नाही ४०० पार करण्यासाठी. अशी भाषा आहे ज्यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष असं बोलतो तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीची भूमिका असते. ईश्वराचा देखील मृत्यू झाला. राम गेले, कृष्ण देखील एका बाणाने पारध्याच्या लोक सोडून गेले. प्रत्येकाला आपली सत्ता सोडावी लागते. देव असो या मनुष्य हे मात्र खरे आहे असे मत खासदार संजय राऊत यांनी यावेळी व्यक्त केले.

### ५० व्या वर्षी महिलेने १४ व्या बाळाला दिला जन्म! डॉक्टरही हैराण; सर्वात मोठा मुलगा २२ वर्षांचा

मेरठ : असं म्हणतात की वेळीच मुलं-बाळ झालेलं बरं! वय वाढतं जात तसा प्रसुतीसाठी त्रास होतो आणि महिलांचं शरीरंही तितकीशी साथ देत नाही असं जुन्या पिढीतील लोक म्हणतात. मात्र उत्तर प्रदेशमधील हापुड येथे राहणाऱ्या इमामुद्दीन यांच्या घरातून १४ व्यांदा गोड बातमी आली आहे. या घरातील इमामुद्दीन यांची पत्नी गुडिया यांनी ५० व्या वर्षी १४ व्या मुलाला जन्म दिला आहे. गुडिया यांची १४ व्यांचा प्रसुती केल्यानंतर डॉक्टरही थक्क झाले आहेत. इमामुद्दीन यांच्या पत्नीने १४ व्या बाळाला जन्म दिल्याचं समजल्यानंतर दूर दूरचे नातेवाईक आणि ओळखीपाळखीचे लोक या दोघांना भेटायला येत आहेत. अनेकजण केवळ इमामुद्दीन, त्यांची पत्नी गुडिया आणि चिमुकल्याला बघायला येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हापुड येथील पिलखुवामधील बजरंगपुरीमध्ये राहणाऱ्या इमामुद्दीन यांची ५० वर्षीय पत्नी गुडिया यांच्या शुक्रवारी सायंकाळी प्रसूती कळा जाणवू लागल्या. त्यानंतर त्यांना पिलखुवा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रमध्ये दाखल करण्यात आलं. तिथून त्यांना मेरठमधील रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला.

### परभणी जिल्ह्यासाठी नवीन ८० बसेस मिळणार

#### राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**परभणी /प्रतिनिधी :** कर्जमाफी होईल म्हणून शेतकरी पीक कर्ज भरत नाही आणि त्यामुळेच त्यांचे सिबिल खराब होत आहे म्हणून अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना ३१ मार्चपूर्वी पीक कर्ज भरावे असे आवाहन केले असेल. महायुती सरकार हे शेतकऱ्यांच्या संपूर्णपणे पाठीशी आहे. शेतकरी सन्मान योजना असो किंवा शेतकऱ्यांना सोलार लाईट असो ही या महायुती सरकारने दिली आहे. सोलर पंपाला तर देशामध्ये पोलीस सबसिडी दिली नाही. पण हे महाराष्ट्र सरकार देत आहे. जेव्हापासून नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आहेत तेव्हापासून शेतकऱ्यांना कोणत्या ना कोणत्या योजनेमार्फत शेतकऱ्यांचा फायदाच केला गेला आहे. शाश्र्वत शेती करता यावी म्हणून वेगवेगळ्या योजना या सरकारने आणले आहेत.



परभणी जिल्ह्यासाठी नवीन ८० बसेस मिळणार आहेत. त्यापैकी काही बसेस सध्या परभणी आगाराला प्राप्त झाल्या आहेत. त्याचबरोबर येणाऱ्या काळात इलेक्ट्रिक बसेस देखील परभणी जिल्ह्याला मिळणार असल्याचे मेघना बोर्डीकर म्हणाल्या.

लाडक्या बहिणी विषयी वेगवेगळ्या अफवा पसरवल्या जात आहेत. पण लाडक्या बहिणींवर कसल्याही प्रकारचा अन्याय केला जाणार नाही. त्यामध्ये कुठेही खंड पडणार नसल्याचेही मेघन बोर्डीकर म्हणाल्या आहेत.

### मी भाग्यवान आहे की..., सोनाक्षीवर माहेरच्यांपेक्षा सासरचे लोक करतात मुलीसारखं प्रेम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इकबाल हे कपल नेहमीच चर्चेत असते. त्या दोघांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असतात. त्या दोघांचे यांनी लग्नानंतर पहिली ईद साजरी केली. एकमेकांसोबत मस्ती करताना दिसतात. आता युट्यूबवर आता तिनं लाइव्ह सेशन दरम्यान, वैवाहित आयुष्याविषयी बोलली आहे.

सोनाक्षी सिन्हानं यावेळी तिचं माहेर आणि सासरच्या घरच्यांमध्ये असलेल्या अंतराविषयी सांगितलं आहे. एका चाहत्यानं तिला माहेर आणि सासरमध्ये काय फरक आहे? त्यावर उत्तर देत सोनाक्षीनं सांगितलं की तिला घरी खूप प्रेम करतात. पण तिच्या सासरचे लोक मुलीसारखी वागणूक देतात आणि आणखी प्रेम करतात. त्यातून तिला वाटतं की ती आधीपासूनचं त्यांच्या कुटुंबाचा एक भाग आहे.

सोनाक्षी सिन्हानं चाहत्याला उत्तर देत सांगितलं की 'एका मुलगी म्हणून माझ्या घरात मी अगदी आनंदानं प्रेमानं होती. पण माझ्या सासरच्या घरी ते मला मुली पेक्षा जास्त प्रेम करतात. मला वाटतं की मी खरंच भाग्यवान आहे की मला सासरं मिळालं आहे. कारण ते जबाबादर सारखं वागतात की कोणाची तरी मुलगी आपल्या घरी आली आहे. त्यामुळे ते प्रत्येकवेळी थोडं जास्तच प्रेम करतात आणि मी कायम याच कुटुंबाचा भाग होती अशी जाणीव करून देतात. जणू काही मी या घरातलीच आहे. तर या सगळ्या गोष्टी ऐकल्यानंतर झहीर इकबालनं मस्करीत म्हटलं, देवाचे आभार, ते खरोखर घडलेल नाही.'

सोनाक्षीनं झहीरला हसत सांगितलं की 'अरे यार भावना समज. प्रत्येक गोष्टीत तर्क शोधण्याची गरज नाही. ही बोलण्याची एक पद्धत असते.' दोघांनी जून २०२४ मध्ये लग्न केलं होतं. इंटरफेथ मॅरेज असल्यामुळे तिचे भाऊ या लग्नात सहभागी झाले नव्हते. शत्रुघ्न सिन्हा आणि पूनम सिन्हा यांनी एकमेकांशी चर्चा केल्यानंतर लेकीला आशीर्वाद देण्यासाठी आले होते.

# कर्जत जामखेड मधून लढायला तयार

## विधान परिषद सभापती राम शिंदे तयार यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा /प्रतिनिधी :** जामखेड मतदार संघातून पहिल्या वेळेस पराभूत झालो. दुसऱ्या वेळेस केवळ ६२२ मतांनी पडलो. आता मात्र सोडणार नाही.२०२९ मध्ये मी कर्जत जामखेड मधून निवडणूक लढवणार असून आणि विजयी संपादन करेल, असे मत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे देशाचे आणि राज्याचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या कालखंडात घेतलेल्या भूमिका आत्ताच्या कलियुगामध्ये घेतलेल्या भूमिका फारकत कुणालाही करता येणार नाही. हा प्रश्न ऐतिहासिक आहे.त्याचे पुरावे द्यावे लागणार आहेत.त्या वाघ्या कुत्र्याचे स्मारक कसे बसवले परत काढले आणि परत बसवले,याचे काय झाले. या सर्व बाबी वरती विचारविनिमय व्हायला लागेल आणि याचे पुरावे तपासले जाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हा मुद्दा कोणीही राजकीय करण्याची आवश्यकता नाही.छत्रपती शिवाजी महाराज यांची स्वराज्य बाबतची भूमिका होती. त्यानंतर होळकर घराण्याने ते विचार आत्मसात केले.यातून काही लोकांना वाद निर्माण करायचा आहे. मात्र,यात वाद निर्माण करणे योग्य होणार नाही.सभापती झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी गेलो होतो.पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मवर्षाच्या संदर्भामध्ये ३१ मे रोजी चौंडी या गावी येण्याचे पंतप्रधान मोदी यांना आमंत्रण दिलं आहे.



मध्यप्रदेश सरकारने महेश्र्वर येथे मंत्री परिषद बैठक घेतली होती.त्यामुळे राज्य सरकारच्या मंत्री परिषद बैठक चौंडी येथे व्हावी, यासाठी मुख्यमंत्री महोदयांना निवेदन केलं आहे. चौंडी येथे देखील मंत्री परिषदेची बैठक होईल, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे.संजय राऊत यांच्यासह अनेक प्रश्नावर राम शिंदे यांनी बोलणे टाळले.अहमदनगरच अहिल्यानगर करण्यामध्ये आणि तसेच सोलापूर विद्यापीठाच्या नामांतरांबाबत सर्व नेत्यांची सहमती असूनही शासनामध्ये निर्णय होत नव्हता. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नामांतराचा निर्णय घेतला आणि त्यावेळी मी मंत्री होतो. अहमदनगर जिल्ह्याला जे अपेक्षित होते ते माझ्या प्रयत्नाने आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झाले.सोलापूर विद्यापीठासंदर्भात काही महत्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्याबाबतीत येत्या पंधरा दिवसाच्या आत दालनामध्ये संबंधित मंत्र्यांची बैठक लावू,विद्यापीठाचा प्रश्न आहे. निर्णय होणे पण अपेक्षित आहे. एक निवडणूक झाली पराजय झाला. दुसरी निवडणूक झाली ६२२ मतांनी पडलो. आता जवळ आलो. आणि हातातोंडाशी आलेला घास ज्यावेळेस जातो. त्यामुळे माणसाच्या मनात भावना निर्माण होते. पुढच्या वेळेस मी सोडणार नाही. त्यामुळे आता २०२९ ला मी कर्जत जामखेड मधून लढायला तयार आहे.२०२९ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांनी माझा प्रचार केला नाही. अजित पवारांनी सांगितला आहे, आता पुढच्या वेळेस करतील का नाही त्यावेळेस ठरेल. असे मत यावेळी विधान परिषद सभापती  राम शिंदे यांनी व्यक्त केले

